आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२५ जून २०२४ - मंगळवार

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं लोकसभा सभापतीपदासाठी ओम बिर्ला यांना पुन्हा संधी दिली आहे. आज त्यांनी सभापतीपदासाठी अर्ज भरला. गेल्या लोकसभेतही ते सभापती होते. विरोधकांकडून काँग्रेस खासदार के. सुरेश यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.  या पदासाठी उद्या निवडणूक होणार आहे.

<><><><>

१८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही नवनिर्वाचित खासदारांचे शपथविधी सुरू आहेत. काँग्रेस खासदार गोवाल पाडवी, श्यामकुमार बर्वे, बळवंत वानखेडे, भाजपाचे खासदार अनुप धोत्रे, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अमर काळे यांनी आज शपथ घेतली. काँग्रेस खासदार शोभा बच्छाव, भाजपा खासदार स्मिता वाघ यांनी मराठीतून शपथ घेतली.  तर राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांनी इंग्रजीतून शपथ घेतली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, काल २६६ खासदारांनी शपथ घेतली होती. आज दुसऱ्या दिवशी उर्वरित खासदार शपथ घेत आहेत.

<><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य सुनेत्रा पवार यांनी आज सदस्यत्वाची शपथ घेतली. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी पवार यांना शपथ दिली.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १९७५ मध्ये देशात लागू करण्यात आलेल्या राजकीय आणीबाणीचा विरोध करणाऱ्या सर्व स्त्री - पुरुषांना आदरांजली वाहिली आहे. सर्व भारतीयांना सन्मानिय असणाऱ्या संविधानाला अपमानित करत काँग्रेसनं

जनतेच्या मुलभूत स्वातंत्र्याचं हनन केलं होतं, याची आठवण करून देणारा हा दिवस असल्याचं, प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><>**

स्वच्छ इंधन निर्मितीच्या क्षमतेमुळे ऊसाचा भाव नव्या उंचीवर पोहोचला आहे, असं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रह्लाद जोशी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारताच्या अध्यक्षतेखाली सुरु असलेल्या ६४ व्या आंतरराष्ट्रीय साखर संघटनेच्या बैठकीत बोलत होते.  ऊसापासून साखर तर त्याच्या कचऱ्यापासून इथेनॉल मिळत असल्यामुळे कमीत कमी पाण्याचा वापर करून ऊसाचं उत्पादन वाढवण्याबाबत संशोधन करण्याचं आवाहन जोशी यांनी उपस्थित तज्ज्ञांना केलं.

**<><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयानं दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामीनाला स्थगिती दिली आहे. ईडीनं सादर केलेली कागदपत्र विशेष न्यायालयानं नीट पाहिली नाही, असं कारण उच्च न्यायालयानं जामीनाला स्थगिती देताना दिलं आहे.

**<><><><>**

विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली. या निवडणुकीसाठी २ जुलै रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येतील ३ जुलै रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ५ जुलै पर्यंत आहे. १२ जुलै रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात मतदान होईल.

**<><><><><>**

माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेत्या सुर्यकांता पाटील यांनी आज मुंबईत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी पक्ष नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते. भविष्यातल्या लढाईसाठी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला असून पक्ष देईल ती जबाबदारी पार पाडू,असं पाटील यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

वसंतराव नाईक कृषी संशोधन प्रतिष्ठानचे कृषी पुरस्कार काल जाहीर झाले. धुळ्याच्या कन्हैयालाल बहुद्देशिय संस्थेला सामाईक पुरस्कार जाहीर झाला असून उल्लेखनीय योगदानाचा पुरस्कार महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कास्ट प्रकल्पाला जाहीर झाला आहे. शास्त्रज्ञ पुरस्कार कॅप्टन लक्ष्मीकांत कलंत्री आणि पत्रकारिता पुरस्कार श्रीकांत कुवळेकर यांना जाहीर झाला आहे. सोमवारी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होईल.

**<><><><><>**

टी २० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारत, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान हे संघ पोहोचले आहे. आज झालेल्या सामन्यात डकवर्थ लुईस पद्धतीनुसार अफगाणिस्ताननं बांग्लादेशला ८ धावांनी पराभूत केलं. त्यामुळं अफगाणिस्तान उपांत्य फेरीत पोहोचला आणि उपांत्य फेरीत जाण्याचं ऑस्ट्रेलियाचं स्वप्न भंगलं.

उपांत्य फेरीतला दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यातला सामना गुरुवारी सकाळी ६ वाजता आणि भारत आणि इंग्लंड यांच्यातला सामना त्याचदिवशी रात्री ८ वाजता होईल.

**<><><><><>**

नैऋत्य मोसमी पाऊस राज्याच्या सर्व भागात पोचला आहे. गेल्या ५ दिवसात धुळे आणि नंदूरबारमध्ये मौसमी पावसाचं आगमन झालं. मध्यप्रदेशातला काही भाग, अर्ध्याहून अधिक गुजरात, छत्तीसगडमध्ये नैऋत्य मौसमी पाऊस दाखल झाला आहे.

**//<><><><><>//**